655

# झोपुप्रा नियमावली – २०१४ नियम क्र. एस.आर. ४ (५) नुसार

## (प्रशासकीय मान्यता)

तांत्रिक विभाग, झोपुप्रा पुणे

दिनांक :- ०५/०९/२०२२

विषय :- स.नं.१७३/३ पै, सि.स.नं. ४६६१/१, पांढारकरनगर,आकुर्डी पिंपरी चिंचवड,पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस एस.आर.४ (५) नुसार प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

संदर्भ :-१) विकसक श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शान यांचेकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव दाखल दि.१३/१०/२०२१.

२) दि.२४/०५/२०२२ रोजीचा स्लम अॅक्ट कलम ३ (क) खालील झोपडपट्टी पुनर्वसन आदेश.

३) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ निर्णय क्र.टीपीएस-१८२२/अनोसं-९/२२/प्र.क्र.२८/२०२२/नवि-१३ दि.०८/०३/२०२२.

४) विकसक यांचा दि.१०/०८/२०२२ रोजीचा विशेष नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४ (५) चा परवानगीसाठीचा प्राप्त प्रस्ताव.

विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेबाबतचा प्रस्ताव विकसक मे. आर. के. डेव्हलपर्स यांचेकडून संदर्भ क्र.१ नुसार या कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी संदर्भ क्र.२ अन्वये कलम ३ (क) झोपूप्रा/सप्रा-३/झोपुआ/५२५/२०२२.दि.२४/०५/२०२२ रोजी पुनर्वसन आदेश पारित झालेला आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ यात आणखी सुधारणा करणेकरिता अधिनियम (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८) हा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४, गुरुवार एप्रिल २६, २०१८ मध्ये पृष्ठ क्र. ११० वर प्रसिध्द झालेला आहे. सदरप्रमाणे Slum Act १९७१ मधील दुरुस्ती / सुधारणा विचारात घेता, **कलम ३ (क) खालील घोषितचे आदेश जाहीर करणे, त्यानंतर एस.आर. ४ (५) खालील प्रशासकीय मान्यता देणे व त्यानंतर कलम ३ (ड) खालील निर्मूलनाचे आदेश पारित करणे व त्यानुसार जागेवर निष्कासनाची कार्यवाही पूर्ण करणे** इ. सर्व आवश्यक कार्यवाही झाल्यानंतर व भूखंड मोकळा झाल्यानंतर, प्रस्तुत योजनेचे बांधकाम नकाशे विकसक यांनी १ महिन्याचा आत कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील, तद्नंतर सदर योजनेचे बांधकाम नकाशे मंजूर करणे संयुक्तिक राहील.

शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे क्षेत्रातील पात्र झोपडपट्टीधारकांना पुनर्वसन प्रकल्पात २५.०० चौ. मी. ऐवजी २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फुट चटई क्षेत्राची निवासी सदनिका देणेबाबतची तरतूद मंजूर केली असल्याने सदरच्या सुधारणेनुसार प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता संदर्भ क्र. ४ अन्वये विकसक श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन यांनी प्रस्तुत योजनेस एस.आर.४ (५) खालील प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे.

झोपुप्रा नियमावली-२०१४ नियम क्र. एस.आर. ४(५) खालील प्रशासकीय मान्यता देणेच्या दृष्टीकोनातून, छाननी टीपणी खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | स.नं.१७३/३ पै, सि.स.नं. ४६६१/१, पांढारकरनगर, आकुर्डी पिंपरी चिंचवड,पुणे |
| २ | विकसकाचे नाव व पत्ता | विकसक श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शान हिंद सर्व्हिसेस, धनकवडी, बह २५/१ पुणे ४३.. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आर्किटेक्टचे नाव व पत्ता | | आर्कि. राहुल माळवदकर<br>स.नं. ६७२/६७३ प्लॉट १०, लोकेश सोसायटी, समर्थ बिल्डिंग, बिबवेवाडी पुणे ३७. |
| ४ | योजना दाखल झाल्याचा दिनांक | | दि. १३/१०/२०२१ (मास्टर क्र. २७५) |
| ५ | स्लम ॲक्ट कलम ३ (क) खालील झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (क्षेत्र = २१००.०० चौ. मी.) | | जा.क्र.झोपूप्रा/सप्रा-३/झोपुआ/५२५/२०२२. दि.२४/०५/२०२२ |
| ६ | स्लम ॲक्ट कलम ३ (ड) अन्वये निर्मूलन आदेश | | अद्याप पारित झालेला नाही. |
| ७ | उप संचालक, नगररचना व विकास विभाग, पिंपरी-चिंचवड यांचेकडील अभिप्राय | | शासकीय जागा MIDC च्या मालकीची असून सदर अभिप्राय पत्र जा.क्र. नरवि/ कावि/ आकुर्डी/ ३७/१३/२०२१ दि.२०२/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला असून सदर अभिप्रायात विषयांकित मिळकत ही औधोगिक झोन मध्ये येत असल्याचे,नमूद केले आहे. |
| ८ | भूमिप्रापण विभागाचा अभिप्राय | | MIDC कडे तसा भूमीप्रापण विभाग अस्तित्वात नाही. |
| ९ | सद्यस्थितीत या योजनेत मालकी हक्कासंदर्भात वा इतर बाबतीत न्यायालयीन स्थगिती/ वाद विवाद/ आक्षेप आहेत वा कसे ? | | याबाबतचे दि. ०२/०८/२०२१ रोजी हमीपत्र विकसकांनी सादर केले आहे. |
| १० | विधी विभागाचा अभिप्राय | | विधी विभागाकडील प्राप्त अभिप्राय जा.क्रं. झोपूप्रा/कायदा - ४१४/२०२१ दि. ३०/०९/२०२१ नुसार प्राप्त आहे. |
| ११ | क्षेत्राबाबतचा तपशिल | | |
| | i) | मोजणी नकाशानुसार येणारे क्षेत्र | २१७३.७० चौ.मी |
| | ii) | ३(क) आदेशानुसार | २१००.०० चौ.मी. (योजनेसाठी विचारात घेतलेले क्षेत्र) |
| | iii) | रस्तारुंदीकरणा खालील क्षेत्र | ०.०० चौ. मी. |
| | iv) | उर्वरित निव्वळ क्षेत्र | २१००.०० चौ. मी. |
| १२ | झोपुप्रा नियम क्र. एस.आर. १४ (१) (a) नुसार १०% आवश्यक Open Space | | सदर योजनेचे क्षेत्र ४०००.०० चौ. मी. पेक्षा कमी असल्यामुळे ओपन स्पेसची आवश्यकता नाही. |
| १३ | i) | एकुण झोपडयांची संख्या | १२० |
| | ii) | उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी झोपुप्रा, पुणे यांच्याकडील पात्रता यादी नुसार | एकूण झोपड्यांची संख्या - १२० |
| | अ) | पात्र निवासी | ३४ |
| | ब) | अपात्र निवासी | ७६ |
| | क) | पात्र बिगर-निवासी | ०१ |
| | ड) | अपात्र बिगर-निवासी | ०० |
| | इ) | पात्र संयुक्त निवासी | ०० |
| | फ) | पात्र संयुक्त बिगर-निवासी | ०० |
| | म) | बंद झोपड्याची संख्या | ०८ |
| | | इतर | ०१ — १ शौचालय |
| | | एकूण | ~~१२०~~ 119 |
| एकुण प्रस्तावित पुनर्वसन सदनिका/दुकाने | | | ~~१२०~~ (११८ निवासी + ०१ बिगरनिवासी ~~+०१ इतर~~) 119 |

653

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | किमान टेनामेंट डेन्सीटीबाबत- (नियम क्र. एसआर १४(३) नुसार) | | |
| (i) | ३६० सदनिका / हेक्टर प्रमाणे होणारी किमान सदनिका संख्या (३६० x २१००.०० / १०,०००) | | किमान आवश्यक सदनिका / दुकाने = ७५<br>प्रस्तावित सदनिका / दुकाने = ~~१२०~~ ११९ |
| (ii) | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी मिळणा-या सदनिका | | निरंक |
| १५ | In situ FSI बाबत-(नियम क्र. एसआर १३(२) नुसार) | | |
| (i) | अस्तित्वात असलेल्या एकूण (पात्र व अपात्र) झोपडयांची संख्या विचारात घेऊन येणारी टेनामेंट डेन्सिटी (१२० x १०,००० / २१००.००) | | अस्तित्वातील टेनामेंट डेन्सिटी ५७१ > ४५० त्यामुळे प्रस्तुत योजनेसाठी एकूण ४.०० इतका च.क्षे.नि. (In situ वापरण्यासाठी) इतका लागू राहील. |
| (ii) | एकुण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (२१००.०० X ४.००) | | ८४००.०० चौ.मी. |
| १६ | प्रकरणी वास्तुविशारदां तर्फे सादर बांधकाम नकाशानुसार आकडेमोड पुढीलप्रमाणे | | |
| | अ) | पुनर्वसन निवासी गाळयांसाठी प्रस्तावित बांधकाम क्षेत्र | ३३६७.०६ चौ.मी. (११९ पुनर्वसन सदनिका) |
| | ब) | पुनर्वसन बिगर निवासी गाळयांसाठी प्रस्तावित बांधकाम क्षेत्र | १२.६२ चौ.मी. (०१ पुनर्वसन गाळा) |
| | क) | पुनर्वसन घटकासाठीचे एकुण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (अ + ब) | ३३७९.६८ चौ.मी. |
| | ड) | प्रस्तावित एकूण बाल्कनी | ६७५.१० चौ.मी. |
| | इ) | २०१४ चे नियमावलीतील नियम क्र. एस.आर.१३(२) प्रमाणे | पुनर्वसन बांधकाम क्षेत्र = ३३७९.६८<br>पुनर्वसन बाल्कनी क्षेत्र = ६७५.१०<br>४०५४.७८<br>X ३५ %<br>१४१९.१७ चौ.मी. |
| | फ) | २०१४ चे नियमावलीतील नियम.क्र. एस.आर.१३ (२) प्रमाणे | पॅसेज = १००१.६३ चौ.मी.<br>जिना = ९३.६० चौ.मी.<br>फायर जिना = १२६.०० चौ.मी.<br>लिफ्ट = ९८.८० चौ.मी.<br>लिफ्ट मशीन रुम = ३०.०० चौ.मी.<br>१३५०.०३ चौ.मी. |
| | ग) | वरील इ व फ या दोन्हीपैकी कमी असलेले क्षेत्र | १३५०.०३ चौ. मी. |
| | ह) | २०१४ चे नियमावलीतील नियम क्र.एस.आर.२१(३) नुसार Free Of FSI | i) सोसायटी ऑफीस (१) व टॉयलेट (१) = (१२+०४) = १६.०० चौ.मी. (सोसायटी ऑफीस व टॉयलेट तळ मजल्यावर प्रस्तावित)<br>ii) बालवाडी व वेलफेअर सेंटर (२ प्रत्येकी) (२५.०० चौ.मी. x ४ प्रत्यकी) = १००.०० चौ.मी. (प्रत्यकी २ बालवाडी व २ वेलफेअर सेंटर तळ मजल्यावर प्रस्तावित) |
| | च) | एस.आर.२१ (२) (७) नुसार Convenience Shopping | योजना क्षेत्र ४०००.०० चौ.मी. पेक्षा कमी असल्याने आवश्यकता नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | छ) | एकूण पुनर्वसन घटकाचे बांधकाम क्षेत्र (३३७९.६८ + ६७५.१०+ १३५०.०३ + १६.०० + १००.००) | ५५२०.८१ चौ. मी. |

चालू वर्षासाठी लागू असलेले PCMC क्षेत्रासाठीचे दरपत्रकामध्ये (विभाग.क्र.५/६४) वाटप व हस्तांतरणासाठीचे दर व (सन्मुख रस्त्याचे रुंदीनुसार) केवळ जमिनीचे दर नमूद केलेले आहेत. त्यामुळे याठिकाणी आवश्यक असलेला सदनिकेचा दर व बांधकामाचा दर हा चालू आर्थिक वर्षासाठी लागू ASR (२०२२-२३) नुसार ग्राह्य धरणे आवश्यक राहील. त्यानुसार बांधकामाचा दर रु. २६,६२०/- प्रति चौ. मी. आहे तर सदनिकेचा दर हा ASR (२०२२-२३) मधील सूचना क्र. ७नुसार विचारात घेणे संयुक्तिक राहील.

- सदरची मिळकत MIDC क्षेत्रातील असून सदरचा निवासी इमारतीचा दर प्रति चौ.मी. प्रमाणे = (खुल्या जमिनीचा दर + घसारयानुसार बांधकामाचा दर) x १.१० x सदनिकेचे क्षेत्र (विभाग.क्र.५/६४)

  = (३५३८० + २६६२०) x १.१० x १

  =६८,२००/- प्रति चौ.मी.

| | | |
|---|---|---|
| १७ | झो.पु.प्रा. नियमावली सन २०१४ मधील नियम क्र. एस.आर. १५ (१) मध्येशासन निर्णय दि.१७/१२/२०१८ अन्वये सुधारणा करणेत आलेली आहे.<br>त्यानुसार सदर प्रकरणी पुढीलप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक रेशो हिशोबीत होत आहे.<br>प्रकरणी प्रथम बांधकाम परवानगी (C.C.) अद्याप दिलेले नाही. | Y = सदनिकेचा दर (सन २०२२-२०२३)<br>= रू. ६८,२००/- प्र चौ.मी.<br>X = बांधकामाचा दर<br>= रू. २६,६२० प्र चौ.मी.<br>n = (Y/X) - २<br>= (६८,२००/ २६,६२०) - २<br>= (२.५६१ - २)<br>= ०.५६१<br><br>R = [२.८०-(n x ०.३०)]<br>= [२.८०-(०.५६१ x ०.३०)]<br>= [२.८० - ०.१६८]<br>= २.६३१ |
| १८ | वरील चटई क्षेत्र निर्देशांक रेशोनुसार अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ (FSI) (५५२०.८१ x २.६३१) | १४५२५.२५ चौ.मी. |
| १९ | योजनेचे एकूण बांधकाम क्षेत्र (Scheme FSI) (१४५२५.२५+ ५५२०.८१) | २००४६.०६ चौ.मी. |
| २० | एकुण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र एस.आर. १४ (८) नुसार (FSI Cap) (२१००.०० X ४.००) | ८४००.०० चौ.मी. |
| २१ | टीडीआर म्हणून देय होणारे बांधकाम क्षेत्रफळ (२००४६.०६ - ८४००.००) | ११६४६.०६ चौ.मी. |

२०. इमारतीच्या उंचीबाबत -

( २०१४ चे नियमावलीतील नियम.क्र.एस.आर. १४ (७) व UDCPR नुसार )

(पुनर्वसन इमारत)

| अनुज्ञेय उंची | प्रस्तावित उंची |
|---|---|
| ४०.०० मी. | २८.९५ मी. (जमिन पातळी पासून)<br><br>(Ground Floor +१ st Floor Parking + २ रा मजला ते ९ मजले रहिवास ) |

651

२१. इमारतीच्या सामासिक अंतराबाबत -

(२०१४ चे नियमावलीतील नियम.क्र.एस.आर. १४ (७) व पुणे मनपा डीसीपीआर १७.१ नुसार)

इमारतीची उंची = २८.९५ मी.

इमारतीची उंची पार्किंग वगळता = २५.८० मी.

( पुनर्वसन इमारत)

| अ. क्र. | तपशिल | ६.०० मी. रस्त्याच्या पूर्वेकडील बाजू (मी) | पश्चिमेकडील बाजू (मी) | दक्षिणे कडील बाजूने (मी) | उत्तर कडील बाजूने (मी) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आवश्यक | ६.०० | ४.८४ | ४.८४ | ४.८४ | यथायोग्य |
| २ | प्रस्तावित | ६.०० | ८.२२ | ७.५० | ७.५० | प्रस्तावित |
| 3 | [illegible] | — | — | — | — | |

२२. इमारतीच्या Provisional fire NOC , EC व इतर बाबत -

i) प्रकरणी विकसकांनी Provisional fire NOC सादर केलेली नाही. इमारतीस बांधकाम परवानगी प्राप्त करण्यापूर्वी सदरप्रमाणे Provisional fire NOC व संबंधित नकाशा विकसकांनी सादर करणे आवश्यक राहील.

ii) सादर नकाशानुसार एकूण Construction Area २०००० चौ.मी पेक्षा कमी असल्याने प्रस्तुत योजनेसाठी EC ची सध्यस्थिती मध्ये आवश्यकता नाही. तथापि, भविष्यात EC ची आवश्यकता भासल्यास तशी अट बांधकाम परवानगी प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे संयुक्तिक राहील.

iii) Refuge Area - २३.२५ मी. उंची आठव्या मजल्यावर प्रस्तावित आहे.

२३. जमिनीचे २५% अधिमूल्याबाबत -

विषयांकित झोपुयो प्रस्ताव हा झोपुप्राकडील नोंदणीकृत विकसक श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन यांचेकडून झोपुप्रा कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे.

सदर झोपुयोखालील जमिन ही MIDC च्या मालकीची असल्याने झोपुप्रा नियमावली-२०१४ नियम क्र.एस.आर.१२ नुसार सदर जमिनीचे क्षेत्रासाठी सन २०२०-२१ चे ASR प्रमाणे येणा-या २५% रक्कम भरून घेणे आवश्यक आहे. सदर योजनेकरिता कार्यालयाकडील परिपत्रक क्रं. ३२ दि.२८/१२/२०२० रोजी सार्वजनिक मालकीच्या जमीनीवरील झोपडयांचा पुनर्विकास करताना खाजगी विकसकाकडून अधिमूल्य आकारणीबाबत टप्पे निश्चित करण्यात आलेले आहे [illegible]सार सदर योजनेचा प्रस्ताव दाखल करतेवेळी तथापी सदर योजनेस मास्टर क्रमांक देणेपू[illegible] पहिला टप्पा [illegible] १० % अधिमूल्य रक्कम रु.१७,३७,७३६/- विकसक यांनी चलन क्र. २८१ अन्वये दि.३०/० [illegible] रणेत आलेली आहे.

आता विकसक यांनी विशेष नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मंजुरी अपेक्षिलेली आहे. वर नमूद परिपत्रकानुसार विकसक यांचेकडून "योजनेतील पुनर्वसन इमारतीचे प्रशासकीय

मान्यतेपूर्वी दुसरा टप्पा १०% अधिमुल्य रक्कम" भरून घेणे आवश्यक आहे. सदरचा तपशील खालीलप्रमाणे

१) एकूण अधिमूल्य रक्कम = २१७२.१७ चौ.मी. x ३२,००० (रेडीरेकनर दर सन २०२१-२२ नुसार) प्रती चौ.मी.

२) एकूण अधिमूल्य रक्कम = ६,९५,०९,४४० /- रु.

३) एकूण २५ % अधिमूल्य रक्कम = ६,९५,०९,४४० /- X २५% = १,७३,७७,३६० /-

४) २५ % अधिमूल्य रक्कम (रक्कमेतील दुसरा १०% चा टप्पा) = १,७३,७७,३६० x १०%

= १७,३७,७३६/- (सतरा लाख सदतीस हजार सातशे छत्तीस रुपये मात्र)

सदर जमिनीचे क्षेत्रासाठी सन २०२१-२२ चे ASR प्रमाणे येणा-या २५% एकूण रू. १,७३,७७,३६० /- इतकी रक्कम भरणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी झो.पु.प्रा.पुणे यांचे दि.०५/१०/२०२१ रोजीच्या टिपणीअन्वये विकसक यांना द्यावायचे पत्राचा मसुदा सोबत सादर करण्यात आलेला आहे.

२४. सर्वसाधारण अभिप्राय -

१) सादर नकाशानुसार एकूण Construction Area २०००० चौ. मी. पेक्षा कमी असल्याने प्रस्तुत योजनेसाठी EC ची सद्यस्थितीत आवश्यकता नाही. तथापि, भविष्यात EC ची आवश्यकता भासल्यास तशी अट बांधकाम परवानगी प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे संयुक्तिक राहील.

२) प्रस्तुत प्रकरणी शासनाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२२/अनौसं-९/२२/प्र.क्र.२८/२०२२/नवि-१३ दि.०८/०३/२०२२ च्या तरतुदीनुसार विकसक यांनी २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फुट) चटई क्षेत्राच्या निवासी सदनिका असलेले नकाशे सादर केलेले आहेत. त्या अनुषंगाने उक्त नमूद शासन निर्णयानुसार भविष्यात शासनाकडील सर्व निर्णय तसेच अटी व शर्ती विकसकांवर बंधनकारक राहतील.

३) सदर योजना क्षेत्रावर विशेष नियमावलीतील नियम क्र.एस.आर.१४(३) नुसार विकसकांनी ( ३४ निवासी पात्र , ७६ निवासी अपात्र व ०१ बिगरनिवासी ) अशा एकूण जागेवरील ११९ झोपडीधारक व ०१ अतिरिक्त सदनिका अशा एकूण ११९ निवासी व ०१ बिगरनिवासी, पुनर्वसन सदनिकांची इमारत प्रस्तावित केली आहे. सदर इमारत पूर्ण झाल्यानंतर पात्र (निवासी/बिगरनिवासी/संयुक्त) विनाशुल्क व स:शुल्क झोपडीधारकांचे पुनर्वसन झाल्यानंतर,उर्वरित सदनिका लगोलग झो.पु.प्रा.चे ताब्यात देणे विकसकांवर बंधनकारक राहील. अशी अट बांधकाम परवानगी प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे संयुक्तिक राहील.

४) तसेच २५% रक्कमे पैकी उर्वरित ८०% रक्कम विकसक यांना पुनर्वसन इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी झोपुप्रा कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक राहील. सदर अट C.C मध्ये नमूद करणे आवश्यक राहील.

५) पिण्याचे पाणी/वापरावयाच्या पाणी टाकीचे नियोजन इमारत निहाय नुसार स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

६) पार्किंग, जिना, पैसेज, व लिफ्ट ई. करिता विद्युत मिटरची स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

७) लिफ्ट, STP, fire hydrant व घन कचरा व्यवस्थापन बाबत ५ वर्षाकरिता AMC करणे बंधनकारक राहील.

649

तसेच ३ (ड) खालील निर्मुलनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व भूखंड मोकळा व निर्वेध झाल्यानंतर, ( झोपुप्रा पुणे विशेष नियमावली - २०१४ व UDCPR २०२० मधील तरतूदी विचारात घेऊन त्यानुसार) प्रस्तावित बांधकाम नकाशांच्या, योग्य त्या सविस्तर छाननी (detailed scrutiny) अंती व विकसकाकडून नियमानुसार जरुर तो प्रिमियम व शासकीय शुल्क भरुन घेतल्यानंतर, आवश्यकतेनुसार बांधकाम परवानगी देणे बाबतची पुढील कार्यवाही, ससंनर स्तरावर करणेत येईल.

कृ. पुढील आदेशार्थ सादर.

05/09/2022
सर्वेक्षक
झो.पु.प्रा., पुणे

6/9/2022
सहायक नगररचनाकार
झो.पु.प्रा., पुणे.

6/9/2022
नगररचनाकार
झो.पु.प्रा., पुणे.

6/9/2022
प्र. सहाय्यक संचालक नगररचना
झो.पु.प्रा., पुणे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झो.पु.प्रा.,